नि.क्र. २३ वरील आदेश
(दि.०१.०२.२०२४)

१. प्रतिवादी नं. १ ते ३ ने सदरचा अर्ज दि.प्र.सं. आदेश ६ नियम १७ प्रमाणे लेखी जबाबात दुरूस्तीकरिता दिला आहे.

२. प्रतिवादींचे असे कथन आहे की, वादीने दावा कलम १ अ मध्ये गट नं. १३३ ही जमिन स्थावर मालमत्ता म्हणून दाखविली आहे. परंतु, सदर जमिन ही वादीच्या ताब्यात नसल्यामुळे वादी याला जमिनीच्या चर्तुःसिमेची माहीती नव्हती. त्यामुळे हेतुपूरस्पर गट नं. १३३ च्या चर्तुःसिमा दाव्यात लिहिन्यात आल्या नाही. वास्तविक कायद्याच्या तरतुदीनूसार चर्तुःसिमा देणे आवश्यक असतांना वादीने चर्तुःसिमा दाव्यात दिल्या नाही. ही बाब लक्षात आल्यानंतर सदर गटाच्या चर्तुःसिमा जबाबात देणेसाठी प्रतिवादींनी हा अर्ज दिला आहे प्रतिवादीला जबाब कलम १३ नंतर १३ अ म्हणून अर्जात नमुद मजकूर दूरूस्त करण्यासाठी अर्ज दिला आहे. करिता अर्ज असे.

३. सदर अर्जास प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे देऊन विरोध दर्शविला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादीचा अर्ज कायद्यानूसार प्रतिपालनिय नसल्यामुळे खारीज करण्यात यावा. गट नं. १३३ मध्ये वादीच्या मालकीची व ताब्यातील १ हे ७८ आर शेतजमिन आहे. वादीचे नावे गट नं. १३३ मध्ये २ हे १५ आर शेतजमिन होती. परंतु, वादी व प्रतिवादीमध्ये रे.दि.मु. नं. ११/२००७ मध्ये झालेला कंसेंट डिक्रीनूसार गट नं. १३३ मधील वादीच्या मालकीच्या व ताब्यातील ०२ हे १५ आर जमिनीपैकी ०० हे३७ आर शेतजमिन ही वादी व प्रतिवादीचा भाऊ रामराव एकनाथ डोंगरे यांच्या हिस्यावर गेलेली आहे.

४. त्यामुळे प्रतिवादींच्या दाव्यातील जमिनीशी व चर्तुःसिमेतही काही एक संबंध नाही. प्रतिवादी हे वादीच्या शेतीच्या चर्तुःसिमा दर्शवून चुकीच्या मजकूराचा अर्ज केला आहे. सदर गट नं. १३३ मध्ये प्रतिवादीची कोणतीही जमिन नव्हती व नाही. त्यामुळे चर्तुःसिमा टाकून जबाबामध्ये दूरूस्ती करण्याचा प्रयत्न निर्माण होत नाही. त्यामुळे प्रतिवादींचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

५. अर्ज, प्रतिज्ञापत्र आणि म्हणणे वाचले. प्रतिवादीतर्फे ॲड श्री. भाला व वादी ॲड श्री. घेवंदे यांच्या युक्तीवाद ऐकला. प्रकरण पडताळले. वादीने दावा कायमच्या मनाई हुकूम मिळणेसाठभ् दाखल केला असून दाव्यामध्ये विनंतीद्वारे दावा कलम १ अ मध्ये वर्णन केलेल्या मौजे खल्याळ गव्हाण

येथील गट नं. १३३ मधील १ हे ७८ आर जमिनीचे वादीच्या उपभोगास, वाहीतीस व ताब्यास तसेच दावा कलम १ ब मधील मौजे नगर परिषद देऊळगावराजा येथील वार्ड नं. ८ मधील जुना मालमत्ता क्र. ३०५/८ व नविन मालमत्ता क्र. W8000273 जालना चिखली रोडवरील वादीच्या जागेच्या ताब्यास व उपभोगास प्रतिवादी त्यांचे नातेवाईक, नोकरचाकर, एजंट इत्यादींनी कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा करू नये अशी कायम मनाई हुकूम मिळणेसाठी मागणी केली आहे.

६. प्रतिवादी नं १ ते ३ यांनी लेखी जबाब व म्हणणे निशाणी २१ कडे दाखल केले आहे. वादीने दाव्यासोबत यादी निशाणी ४/१ कडे रेदिमु नं. ११/२००७ ची तडजोड हूकूमनाम्याची नक्कल दाखल केली असून त्यामध्ये निशाणी २५ कडील अटी व शर्ती प्रमाणे गट नं. १३३ २ हे. १५ आर. आकार रूपये ७ रूपये २५ पैसे, हिस्सा ० हे. ०.३७ आर. याच्या चर्तुःसिमा पूर्वेला तेजराव एकनाथ यांची जमिन, पश्चीमेला तेजराव एकनाथ यांची जमिन, उत्तरेस गंगाराम सोरमारेची जमिन आणि दक्षीणे कोंडीबा दंदालेंची जमिन. वरील चर्तुःसिमेच्या आतील शेतजमिन वादी रामराव यांच्या हिश्यावर असून मालकी हक्काने त्यांच्या ताब्यात होती व राहिल. वरील गट नंबर मधील राहिलेली शेतजमिन जुन्या वाटणीपत्रकाप्रमाणे ज्याच्या त्याच्या नावावर आहे. सदर गट नं. १३३ वर असलेले बॅकेचे कर्ज प्रतिवादी नं. १ तेजराव एकनाथ डोंगरे हे व्याजासह भरतील. सदर तडजोड हूकूमनामा हा ०९.१०.२००७ रोजी पारित करण्यात आला.

७. त्यामध्ये प्रतिवादी नं. १ यास सदर जमिन ही हिश्याला व ताब्यात देण्यात आली होती याबाबत मजकूर नमुद नाही. अशास्थीतीत प्रतिवादीने सदरचा अर्ज जो दूरूस्ती करता दिला आहे त्यामध्ये सद्यस्थीतीला लेखी जबाबामध्ये दूरूस्ती करण्याकरिता म्हणून आवश्यक ते कागद सोबत दाखल केले नाहीत. प्रतिवादीने सदर दूरूस्तीद्वारे गट नं. १३३ मधील ५ एकर १५ गूंठे जमिन ही प्रतिवादी नं. १ च्या हिश्याला व ताब्यात देण्यात आली होती व या अर्जात नमुद केलेल्या चर्तुःसिमेच्या आतील जमिन ही प्रतिवादी नं. १ च्या ताब्यात मालकी हक्काने आहे अशा प्रकारची दूरूस्ती मागून निश्चीतच प्रतिवादी हे गट नं. १३३ या मिळकतीची मालकी त्यांची आहे असे कथन करीत आहे. वस्तुतः लेखी जबाबामध्ये अशा स्वरूपाची दूरूस्ती कायद्याने करता येणार नाही कारण दि.प्र.सं. आदेश ६ नियम १७ च्या तरतुदींचा विचार करता प्रतिवादीने लेखी जबाबात दूरूस्ती करण्याकरिता अर्जामध्ये दिलेले कारण योग्य, संयूक्तीक, कायदेशिर आहे की नाही हे पाहणे गरजेचे आहे. तसेच, प्रतिवादींना सदर दूरूस्ती मागण्याकरिता त्यांनी त्याबाबत पूर्वी काय दक्षता घेतली व त्यामुळे ते सदर दूरूस्ती अभिलेखावर आणू शकले नाही याबाबत अर्जामध्ये कूठेही कथने नमुद केलेली नाही.

८. करिता, प्रतिवादींनी मागतलेली दूरूस्तीमुळे लेखी जबाबाचे आणि म्हणण्यातील

प्रतिवादीनी घेतलेला बचाव निश्चीतच बदलत आहे. मागीतलेली दूरूस्ती ही सद्यस्थीतीला योग्य, वाजवी व दाव्यातील मागणी आणि वादी प्रतिवादींमधील वाद निर्णीत करण्यास निश्चीतच उपयोगी पडणारी अशी नाही. त्यामुळे, यदाकदाचित दूरूस्ती मंजुर करावयाची झाल्यास तर निश्चीतच दाव्यामध्ये गूंतागूंतीची परिस्थीती निर्माण होणार आहे, जी बाब कायद्यास अभिप्रेत नाही. त्यामुळे मागितलेली दूरूस्ती ही कायद्याच्या कक्षेत बसत नाही व दि.प्र.सं. च्या आदेश ६ नियम १७ च्या तरतुदीखाली येत नाही. सबब,सदर दूरूस्तीचा अर्ज निव्वळ निशाणी ५ कडील अर्जाच्या चौकशीस विलंब लागावा व कामकाज प्रलंबित राहावे या एकमेव हेतूने दिला असल्याने सदर अर्ज कायदेशिररित्या चालत नाही. सबब,वरील विश्लेषनाचा विचार करता अर्जाच्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे :-

आदेश

अर्ज नि.क्र. २३ नामंजुर करण्यात येत आहे.

स्वा/-

दि.०१.०२.२०२४.

शैलेश यु. कंठे
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
देऊळगावराजा.

रुपेश अशोक दांडगे,
लघुलेखक.